# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 02 April 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ०२ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०

****

- वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत सादर–विधेयकाच्या बाजूने तसंच विरोधात सदस्यांकडून मतं व्यक्त
- विकासकामांसाठीच्या निधीचा योग्य वापर करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश
- राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून पथकराच्या दरात चार ते पाच टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय

आणि

- छत्रपती संभाजीनगर इथं पाच आणि सहा एप्रिलला राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेचं आयोजन

****

वक्फ सुधारणा विधेयक आज लोकसभेत सादर झालं. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहारमंत्री किरेन रिजिजू यांनी हे विधेयक सादर करतांना, वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन आणि प्रशासन यात सुधारणा करणं हे या विधेयकाचं उद्दिष्ट असल्याचं सांगितलं. हे विधेयक केवळ मालमत्ता व्यवस्थापनाशी निगडित असून सरकार कोणत्याही धार्मिक स्थळाच्या नियमांत बदल किंवा हस्तक्षेप करणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. त्यानंतर या विधेयकावर चर्चेला सुरुवात झाली. पंचायतराज मंत्री राजीव रंजन उर्फ लल्लनसिंह, भाजपचे रविशंकर प्रसाद, अनुरागसिंह ठाकूर, शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, आदी सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने तर काँग्रेसचे गौरव गोगोई, समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी तसंच सौगत राय, द्रमुकचे ए राजा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे

अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निलेश लंके, आदी सदस्यांनी विधेयकाच्या विरोधात मतं मांडली. सध्या लोकसभेत या विधेयकावर चर्चा सुरू आहे

****

राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी वक्फ संशोधन विधेयकाचं स्वागत केलं आहे. या जमिनी मुस्लिमांना देण्याचं आवाहन त्यांनी केलं. ते म्हणाले –

**बाईट – प्यारे खान, अध्यक्ष, राज्य अल्पसंख्याक आयोग**

****

वक्फ सुधारणा विधेयक हे कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून, यातून संविधानाच्या प्रास्ताविकेतली धर्मनिरपेक्षता प्रतिबिंबित होत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ज्यांची सद्सद्विवेकबुद्धी जिवंत आहे अशी प्रत्येक व्यक्ती या सुधारणा विधेयकाला पाठिंबा दर्शवेल असं सांगतानाच हे विधेयक संमत होईल असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

निवडणुकीत मुस्लिम मतांसाठी राजकारण करणाऱ्यांचे खरे चेहरे आज वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाच्या निमित्ताने समोर आल्याची टीका शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ते आज मुंबईत विविध विभागांच्या आढावा बैठकीनंतर पत्रकारांशी बोलत होते.

महायुतीच्या गेल्या कार्यकाळात विकासकामांना जी गती होती, तीच आताही कायम ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं आहे. सर्व यंत्रणेला शंभर दिवसांत कामाचं उद्दीष्ट दिलं होतं, या अवधीत ६० टक्के कामं पूर्णत्वास जात असून, २५ टक्के कामं प्रगतीपथावर आहेत, उर्वरित १५ टक्के कामं पुढच्या कालावधीत पूर्ण होतील, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

****

सरकारकडून विकासकामांसाठी दिल्या जाणाऱ्या निधीचा योग्य वापर करण्याचा इशारा उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिला आहे. ते आज बीड इथं बोलत होते. जिल्ह्यातील विकास कामांना निधी कमी पडू देणार नाही, मात्र या निधीचा योग्य विनियोग करण्याची सूचना पवार यांनी दिली, ते म्हणाले –

**बाईट – उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार**

दरम्यान, पवार यांनी जिल्ह्यातल्या विविध विकास कामांची आढावा बैठक घेतली. तसंच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवा संवाद मेळाव्याला मार्गदर्शन केलं. समाजातील जाती–जातीमध्ये निर्माण झालेला तिढा संपवण्याचं काम सर्वांनी मिळून करायचं आहे, यासाठी पक्षांतील कार्यकर्त्यांची निवड काळजीपूर्वक करावी असं आवाहन पवार यांनी पदधिकाऱ्यांना केलं.

****

भारतीय नौदलाच्या आयएनएस तर्कश या लढाऊ जहाजाने पश्चिम हिंद महासागरात अडीच हजार किलो अंमली पदार्थ जप्त केले. नौदलाच्या विमानानं दिलेल्या माहितीनंतर आयएनएस तर्कशने या जहाजाची चौकशी करून ते अडवलं आणि तपासणी केली असता, त्यात अमली पदार्थ सापडल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि लॉजिंग सुविधा असलेल्या गेस्ट हाउससाठी औद्योगिक वीज दर श्रेणीमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. काल १ एप्रिलपासून हा निर्णय लागू झाला. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. एमईआरसीने पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने वीज दर कमी करण्याची शिफारस केली आहे.

****

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे देशाचं बौद्धिक पुनर्जागरण असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी एका दैनिकात लिहिलेला लेख सामाजिक माध्यमावर सामायिक करताना पंतप्रधानांनी ही बाब नमूद केली. नवं शैक्षणिक धोरण शिक्षण आणि नवोन्मेषाच्या माध्यमातून आत्मनिर्भर आणि जागतिक स्तरावर प्रतिस्पर्धा करु शकणारं राष्ट्र घडवण्याचा मार्ग प्रशस्त बनवत आहे, असंही प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

****

भारतीय रेल्वेनं महिलांच्या सुरक्षिततेसाठी अनेक उपाययोजना अंमलात आणल्या असून येत्या दीड ते दोन वर्षात रेल्वे स्थानकांमध्ये पुरेसे सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली.

प्रत्येक रेल्वे विभागात, परिमंडळात आणि रेल्वे मंडळात वॉर रूम स्थापन केल्या असून त्यांवर नियमित देखभाल केली जात असल्याचं त्यांची सांगितलं.

****

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं देशभरातल्या एक्सप्रेसवे आणि राष्ट्रीय महामार्गांवरील पथकराच्या दरात आजपासून चार ते पाच टक्क्यांनी वाढ केली आहे. यामुळे महामार्गांच्या दुरुस्ती आणि विस्तारीकरणात मदत होईल असं प्राधिकरणानं म्हटलं आहे. यात हलक्या वाहनांसाठी ५ ते १० रुपये तर जड वाहनांसाठी २० ते २५ रुपयांनी वाढ होणार आहे. कारसाठी मासिक पासचा दर ९३० रुपयांवरून ९५० रुपये करण्यात आल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगरात ऐन सणासुदीच्या काळात झालेल्या विस्कळीत पाणीपुरवठयाच्या समस्येवर संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींची तातडीची बैठक घ्यावी, अशी मागणी आमदार संजय केनेकर यांनी केली आहे. केनेकर यांनी महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांना याबाबतचे पत्र पाठवलं आहे. शहरातल्या पाणीपुरवठ्याबाबत महानगरपालिका गंभीर नसल्याचं केनेकर यांनी म्हटलं आहे

****

परभणी शहर महानगरपालिकेतर्फे अतिक्रमण हटाव मोहीमेअंतर्गत आज दोनशे पेक्षा जास्त अतिक्रमण काढण्यात येत आहेत. शहरात या अतिक्रमणामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येची नागरिकांनी पालिकेकडे तक्रार केली होती. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अंकीत यांनी  तालुका आणि गाव पातळीवर शंभर दिवसाच्या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आज झालेल्या समन्वय सभेत त्यांनी या सूचना केल्या.

****

छत्रपती संभाजीनगर इथं येत्या पाच आणि सहा एप्रिलला राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धा होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातल्या क्रीडा विभागाच्या मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेत ज्युनियर मुले, मुली तसंच पुरुष आणि

महिला अजिंक्यपद स्पर्धेसाठी सामने होतील. स्पर्धेचं उद्घाटन ५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असून, बक्षीस वितरण ६ एप्रिलला सायंकाळी साडे सहा वाजता होणार आहे.

****

अर्जेंटिना इथं उद्यापासून सुरू होणाऱ्या ISSF नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताचे ४३ खेळाडू सहभागी होत आहेत. या पथकाचं नेतृत्व ऑलिंपिक पदक विजेती मनु भाकर करणार आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ आज होणार आहे.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना आज गुजरात टायटन्सशी होणार आहे. हा सामना बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल.

****

कर्नाटक राज्यातल्या येरमा-रायचूर-मारिचेथल स्थानकांवरील स्वयंचलित सिग्नलच्या कामामुळे दक्षिण मध्य रेल्वेअंतर्गत नांदेड विभागातून धावणाऱ्या काही रेल्वे गाड्या अंशत: रद्द करण्यात आल्या आहेत. प्रवाशांनी याची नोंद घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****